# VIVEKOTSAV

*Inculcating The Spirit Of Vivekananda*

# स्वामी विवेकानंद जयंती निमित्त
# ५१ वी आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा - २०२५

## मराठी


**RAMAKRISHNA MATH**

**&**

**RAMAKRISHNA MISSION**

Swami Vivekananda Chowk, 12th Road, Khar (W), Mumbai - 400052
Tel.: 022-6181 8000 / 6181 8002
Email : vivekotsavrkm@gmail.com Website : www.mumbairkm.org

*मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# १. नरेनचे अनौपचारिक शिक्षण

शिक्षणाचे पहिले धडे आईच्या चरणांपाशीच मिळतात. आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे म्हणून भुवनेश्वरीदेवी खूप उत्सुक होत्या. आईच्या मांडीवर खेळत असतानाच नरेंद्रनाथांना आपल्या देवदेवतांची महती, भारतातील संतांचा आणि आपल्या पूर्वजांचा अलौकीकपणा कळून आला. यात त्यांचे आजोबा दुर्गाप्रसादही होते. आईकडूनच त्यांना प्रथम रामायण, महाभारतातील कथा ऐकायला मिळाल्या. दत्तांच्या घरी रोज दुपारी ह्या कथा वाचल्या जात. एखादी प्रौढ महिला किंवा कधी कधी स्वत: भुवनेश्वरीदेवी मोठ्याने त्या कथा वाचत. घरातील इतर सर्व स्त्रिया आपापली कामे आटोपल्यावर कथा ऐकायला येत. त्या छोट्याशा बैठकीत एरव्ही चंचल असणारे नरेंद्रनाथ, वाचन होईपर्यंत स्वस्थ बसत आणि कथा ऐकत. ह्या कथांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला यात शंका नाही.

नरेन आपल्या आजीपासून (आईची आई) आणि पणजीपासून बऱ्याच गोष्टी शिकला. नंतरच्या काळात, महेन्द्रनाथांनी (स्वामीजींच्या भावंडापैकी एक) आपल्या पणजीबद्दल (आजीच्या आईबद्दल) लिहिले आहे की त्या वैष्णव पंथी होत्या. त्यांना भागवतातील आणि अन्य वैष्णव ग्रंथातल्या अनेक कथा, उपकथा तसेच वैष्णव धर्माची शिकवण माहीत होती. आजीही भागवतातील अनेक कथा सांगायची. खरं म्हणजे नंतरच्या काळात आपल्या पाश्चात्य शिष्यांना व श्रोत्यांना सांगितलेल्या अनेक कथा त्यांनी ह्या दोघांकडून आपल्या लहानपणी ऐकल्या होत्या.

रस्त्यावरुन गाणी म्हणत जाणाऱ्या बाऊलांकडूनही छोटा नरेन बरेच काही शिकला. ही गाणी म्हणणारी मंडळी फार मजेदार होती. कधी कधी त्यांचा मोठाच्या मोठा जथ्था अगतिक होऊन यायचा. कुटुंबाची दुर्दशा असायची. पण ते नेहमी आनंदी असत. काहींच्या सोबत महामायीची प्रतिमा असे. कधी कधी बापाबरोबर मुलगा कृष्णाच्या वेषात येई. त्याच्या पायातील चाळ नाचताना छुम छुम वाजत. वडील खर्जात गात आणि ढोलकीवर थाप देत असत. घराघरांसमोर ते देवीची गाणी म्हणत किंवा गाण्यातून देवांच्या कथा सांगत. हे बाऊल म्हणजे म्हणायला भिक्षेकरी पण खरेतर लोकांमध्ये आध्यात्मिक भाव जागवणारे दातेच होय! नरेनच्या घरी हे लोक वारंवार येत असत आणि त्याची आईही त्यांचे प्रेमाने स्वागत करी. कारण तिला माहीत होते की मुलाला ह्या गोष्टी जितक्या जास्त आणि चांगल्या कळतील तितकी त्याची राष्ट्रीय संस्कृतीची जाण दृढ होईल आणि तो एक चांगला सत्यप्रिय माणूस बनेल.

परंतु शाळा म्हटली की येथे सर्व प्रकारचे सवंगडी मिळतात. नरेनलाही तसे मिळाले. काही दिवसातच अपशब्दांचा त्याचा संग्रह इतका वाढला की घरातले सारेजण हतबुद्ध झाले. त्याने पुन्हा शाळेत जाऊ नये असा निर्णय घरातील सर्व मंडळींनी घेतला. देवघरातच एक वर्ग सुरु करण्यात आला. नरेन बरोबरच त्याचे इतर चुलत भाऊ व वडिलांच्या काही मित्रांची मुले घरीच शिकू लागली. एका खाजगी शिक्षकाची नेमणूक करण्यात आली.

नरेनची कुशाग्र बुद्धी लवकरच सगळ्यांच्या ध्यानात आली. इतर मुले बाराखडी गिरवत होती तेव्हा नरेन चक्क लिहायला वाचायला लागला. त्याची स्मरणशक्ती विलक्षण होती. शिक्षक शिकवत असताना त्याला डोळे मिटून स्थिर बसण्याची वा पहुडण्याची वेगळीच लकब जडली होती. ही लकब खाजगी शिक्षकांच्या लक्षात आली नाही आणि शेवटी एके दिवशी ते चिडले. त्यांनी आपल्या या विद्यार्थ्याला दोन्ही हातांनी गच्च धरून रागाने हलवले. हेतू हा, की तो झोपला असल्यास उठावा. नरेनने आश्चर्याने डोळे उघडले. त्याला खूप वाईट वाटले. त्याने शिक्षकांचे सगळे रागावणे ऐकून घेतले. नंतर

शिक्षकांनी तासभर जे काही शिकवले ते खडान्‌खडा म्हणून दाखवून आपली बाजू सिद्ध केली. त्यानंतर मात्र शिक्षकांचे त्या मुलाबद्दलचे मत बदलून गेले. त्यांनी इतकी मुले पाहिली होती पण नरेनसारखी अफाट स्मरणशक्ती असलेला कुणीच नव्हता.

नरेनची शाळा अशा रीतीने घरीच सुरु झाली असली तरी आईच्या अंगाखांद्यावरील त्याचे शिक्षण थांबले नव्हते. पुस्तके वाचण्याबद्दल म्हणाल तर बंगाली मुळाक्षरे त्याने आईकडूनच शिकून घेतली होती आणि प्यारीचरण सरकारचे "फर्स्ट बुक ऑफ इंग्लिश" वाचून काढले होते.

नैतिक मूल्यांची शिकवण नरेनने आईकडूनच घेतली होती. संसारातील मायाजालाच्या भोवऱ्यात सापडल्यावरही नीतीमूल्यांची जाण कशी ठेवावी, ईश्वर हाच आपला एकमात्र आधार आहे आणि जीवनात त्याच्या चरणांचा आधार कसा घ्यावा ह्या गोष्टी नरेन आईजवळच शिकला.

"तुझे सारे जीवन पवित्र व मंगलमय होवो, इतरांच्या सन्मानाला तुच्छ लेखू नकोस आणि स्वत:चाही सन्मान जप" अशी शिकवण नरेनला आईकडूनच मिळाली. नेहमी शांत असावे, परंतु प्रसंगी कठोरही होता यायला हवे हे ही तिने शिकवले. जन्मभर नरेंद्रनाथांचे आईवर गाढ प्रेम होते आणि तिने शिकवलेल्या गोष्टी ते कधीही विसरले नाहीत. ते म्हणत असत, "जो आपल्या आईला अत्यंत पूज्य मानत नाही तो कधीही जीवनात उत्कर्ष पावणार नाही." अनेक प्रसंगी त्यांनी अभिमानाने सांगितले आहे, "माझ्या ज्ञानसंवर्धनाचे श्रेय मी सर्वस्वी माझ्या आईलाच देतो."

नरेनच्या शिक्षणास कुटुंबातल्या इतर व्यक्तींचाही हातभार लागला होता. रात्री नरेन आपले एक नातेवाईक नृसिंह दत्त यांच्या जवळ झोपत असे. श्रीरामकृष्णांचे गृहस्थ भक्त, श्री. रामचंद्र दत्त यांचे ते वडील. ते स्वत: संस्कृतचे विद्वान पंडित होते. युवा मन आणि चारित्र्य घडवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संस्कृतातील कठीण ग्रंथ मुखोद्गत करणे अशी त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी रात्री नरेनकडून 'मुग्धबोध' व्याकरणातली सूत्रे, कुटुंबाची

वंशावळ, देवी देवतांची स्तोत्रे आणि रामायण महाभारतातील प्रदीर्घ उतारे पाठ करुन घेतले. अशा रीतीने एका वर्षाच्या आत नरेनचा संस्कृत अध्ययनाचा पाया पक्का झाला. नंतरच्या आयुष्यातील त्यांच्या संस्कृतच्या व्यासंगाचे मूळ बालपणीच्या ह्या घटनांमध्ये आढळते.

नरेनच्या शिक्षणात त्यांच्या वडिलांचा सहभागही उल्लेखनीय होता. संगीत हा जीवनातील निर्भेळ आनंदाचा स्रोत आहे याची जाणीव असल्यामुळे नरेनला संगीताचे शिक्षण मिळावे याबद्दल ते आग्रही होते. कदाचित कुटुंबात असलेल्या या संगीत प्रेमामुळेच नरेंद्रनाथ एक सिद्ध संगीतज्ञ झाले.

श्री. विश्वनाथ दत्तांचे आपल्या मुलांशी वागणे फार समंजसपणाचे होते. सुसभ्य वागणूक आणि आत्मसन्मान अंगी स्वत:च बाणवण्यास मुलांना प्रवृत्त करावे असे विश्वनाथ दत्तांना वाटायचे. मुलांपैकी एखाद्याने दुर्वर्तन केले तर ते त्याला प्रत्यक्ष रागवत नसत, पण त्याच्या मित्रांमध्ये त्याचे हसे होईल असे काही करत. उदाहरणादाखल, एकदा नरेन आपल्या आईशी तुटकपणे वागला आणि काहीतरी कठोर बोलला. याबद्दल विश्वनाथ त्याला प्रत्यक्ष रागावले नाहीत. परंतु नरेन आपल्या मित्रांबरोबर ज्या खोलीत बसायचा त्या खोलीच्या दरवाज्यावर त्यांनी, "आज नरेन आईला असे म्हणाला" असे लिहून ठेवले. हे वाक्य पुन्हा पुन्हा त्याच्या मित्रांच्या नजरेस पडले. नरेन खजील झाला व त्याने आपली वागणूक सुधारली.

वडील वकील असल्याने अनेक पक्षकार घरी येत. ते आपसात बोलत बसत आणि त्यांची पाळी आली की वकीलसाहेबांसमोर जात. ही मंडळी विभिन्न जातीधर्मांची असत. प्रत्येक जातीच्या लोकांसाठी हुक्का वेगवेगळा असे. एका मुसलमान पक्षकाराशी नरेनचे चांगले जुळले होते. जात हा काय वेगळा प्रकार आहे ते नरेनला कळेना. एका जातीच्या व्यक्तीने दुसऱ्या जातीच्या व्यक्तीबरोबर का जेऊ नये किंवा त्याचा हुक्का का ओढू नये हे नरेनला कळेना! तसे केले तर काय होईल? आभाळ कोसळेल? तो मरेल? असे केल्यास काय होते हे पाहाण्याचे नरेनने ठरवले. नरेनने त्या सर्व

हुक्क्यांचा ओळीने समाचार घेतला. नाही! काहीही झाले नाही. तितक्यात त्याचे वडील तिथे आले, "अरे, काय करतोस?" ते म्हणाले. "बाबा जात मोडली तर काय होतं ते पाहात होतो. पण काहीच तर झाले नाही." वडील मोठ्याने हसले आणि मनात आपल्या मुलाच्या बुद्धीचे कौतुक करीत परत आपल्या अभ्यासाच्या खोलीत गेले.

जगात वैचारिक बदल घडवून आणणारे प्लेटो आणि ॲरिस्टॉटल सारख्यांना किंवा जगाचे भवितव्य बदलणाऱ्या ॲलेक्झांडर किंवा सीझर सारख्या व्यक्तींना आपल्या सामर्थ्याची जाणीव अगदी लहानपणापासून असते. आपल्याला काय करायचं आहे याचे ज्ञान त्यांना उपजतच असते. नरेंद्रनाथालाही स्वत:ची महत्ता जाणवत होती. त्याच्या वयाची इतर मुले अनभिज्ञ होती. परंतु आपल्याला पुढे आपले कार्य साधण्यासाठी कोणते संघर्ष करावे लागणार याची अंधुक पण निश्चित बालिश कल्पना नरेंद्रनाथांना होती.

• • •

*मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)*

*विशेष सूचना :*

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## २. दयाळू नरेन

नरेंद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाचा एक महत्वाचा पैलू म्हणजे त्यांना इतरांविषयी वाटणारी कळकळ. त्यांच्या सहकाऱ्यांसाठी, मित्रांसाठी, ते साक्षात् दयेची मूर्तीच होते. आपल्या मित्रमंडळींना घेऊन जर ते कुठे सहलीला गेले असतील आणि तेथे एखादा मित्र अचानक आजारी पडला किंवा जखमी झाला तर सर्व मौज मजा सोडून ते त्याची सेवा करत. एकदा नरेंद्र वीसेक मुलांना घेऊन कलकत्याचा किल्ला बघायला गेला. तिथे एक मुलगा अचानक वेदनेने तळमळू लागला. बाकीच्या मुलांनी त्याची चेष्टा केली आणि पुढे निघून गेले. तो मुलगा बिचारा एकटा पडला. त्याच्या वेदना इतक्या वाढल्या की तो तिथेच खाली मटकन् बसला आणि तळमळू लागला. नरेन इतर मुलांबरोबर आधी पुढे गेला होता. पण अचानक तो परत फिरुन इतर मुलांना म्हणाला, "कदाचित त्या मुलाला काहीतरी गंभीर आजार उद्भवला असेल. तुम्ही व्हा पुढे! आपल्यापैकी कुणाला तरी त्याच्याकडे परत गेलं पाहिजे. मी जातो आणि बघतो." नरेन त्या मुलाकडे परत गेला. तो अगदी वेळेवर पोहोचला कारण त्या मुलाला खूप ताप आला होता. नरेनने त्याला घरी नेऊन पोहचवले.

नरेंद्र आंणि त्याचे मित्र, श्री. नवगोपाल मित्रांच्या व्यायामशाळेचे सभासद होते. श्री. नवगोपाल मित्रांनी आपल्या व्यायामशाळेची व्यवस्था ह्या मंडळींच्या हातातच सोपवली होती. एकदा नरेन आणि त्याची मित्रमंडळी व्यायामासाठी लागणारा जड ट्रॅपिझ, म्हणजे एक प्रकारचा झुला बसवण्याचा प्रयत्न करीत होती. लवकरच ते काय करताहेत ते बघायला गर्दी जमली. त्यात एक इंग्लिश खलाशीही होता. नरेनने त्याला मदत करण्याची विनंती

केली. त्या खलाश्याने ती विनंती मान्य करुन तो जड ट्रॅपिझ उभारण्यासाठी त्यांना मदत करु लागला. तो जड झुला उचलताना निसटून त्या खलाशावरच पडला. त्या धक्क्याने तो खलाशी बेशुद्ध पडला. तो खलाशी मेला असे वाटून सगळे घाबरले. नरेन आणि त्याचे एक दोन मित्र वगळता सर्वांनी तिथून पलायन केले. नरेनने मात्र तात्काळ आपल्या धोतराचा एक तुकडा फाडून त्या खलाश्याची जखम बांधली. त्याच्या तोंडावर पाणी शिंपडले. त्याला हळुवारपणे वारा घातला. जेव्हा तो खलाशी शुद्धीवर आला तेव्हा नरेन आणि त्याचे मित्र त्याला जवळच्या एका शाळेच्या इमारतीत घेऊन गेले. डॉक्टरला बोलावणे पाठवले. तसेच नवगोपाल मित्रांनाही ही हकिकत कळवली. जेव्हा एका आठवड्याच्या शुश्रुषेनंतर तो खलाशी बरा झाला तेव्हा आपल्या मित्रांकडून गोळा करून काही रक्कमही नरेनने त्याला दिली.

भटकणाऱ्या साधू संन्याशांविषयी नरेनला खूप आकर्षण वाटत असे. जेव्हा जेव्हा असा एखादा साधू दाराशी येई तेव्हा तेव्हा लहान नरेन आनंदाने त्यांच्याकडे धावत जाई. एकेदिवशी असाच एक संन्यासी दाराशी येऊन भिक्षा मागू लागला. लहानग्या नरेनने हाताने सुंदर भरतकाम केलेले धोतर नेसले होते. ते धोतर तो आता थोडा मोठा झाला म्हणून त्याला नेसवले होते. त्याला ते धोतर फार आवडत असे. त्याने तात्काळ आपले इवलेसे धोतर त्या साधूला देऊन टाकले. त्या साधूने ते फेट्यासारखे आपल्या डोक्याभोवती गुंडाळले आणि त्या लहानग्याला दुवा देत तो निघून गेला. घरातल्यांनी धोतराचं काय झालं म्हणून त्याला विचारलं तेव्हा तो म्हणाला, "एक साधू भिक्षा मागत होता त्याला मी देऊन टाकलं." ह्या दत्तांच्या घरात आपलं चांगलच स्वागत होतं हे माहीत असल्याने अनेक साधू त्यांच्या घरी येत असत. नरेंद्रनाथांचे वडील विश्वनाथ दत्त साधूंचे चांगले आदरातिथ्य करीत. विश्वनाथ दत्तांच्या वडीलांनी म्हणजेच नरेंद्रनाथांच्या आजोबांनी संन्यास घेतला होता. विश्वनाथ दत्तांना या साधूंना पाहिल्यावर त्यांचीच आठवण होत असे. वर उल्लेख केलेली घटना घडल्यावर नरेनवर चांगलेच लक्ष ठेवण्यात आले. कधीही एखादा साधू भिक्षा मागायला दाराशी आला की नरेनला तो जाईपर्यंत एका खोलीत कोंडून ठेवत

असत. पण ह्यामुळे छोट्या नरेनला काही फरक पडत नसे. तो त्या खोलीच्या खिडकीतून त्या खोलीत मिळेल ती वस्तू खाली उभ्या असलेल्या साधूसाठी टाकत असे. आपलं काम अशारीतीने पार पडल्यावर नरेन आनंदाने नाचत असे.

नरेनने अनेक प्राणी पाळले होते. त्याला या प्राण्यांबरोबर खेळायला खूप आवडत असे. त्याने एक माकड, एक बोकड, एक मोर, कबुतर, दोन-तीन गिनी पिग्स पाळले होते. त्याच्या घरच्या गाईवर त्याचे विशेष प्रेम होते. एखाद्या सणावारी त्याच्या बहिणी गाईची कुंकुम तिलक लावून हार घालून पूजा करत असत तेव्हा नरेनही त्यांच्याबरोबर जात असे. आपल्या इवल्या इवल्या हाताने गाईला प्रेमाने थोपटून तो तिच्याशी गोड स्वरात बोलत असे.

नरेंद्रनाथ कॉलेजात असतानाची एक घटना... जनरल ॲसेंब्लीची एक संस्था कॉलेजातील गरीब विद्यार्थ्यांना मदत करीत असे. काही विद्यार्थी तर अत्यंत गरीब असत. अशा काही विद्यार्थ्यांना फी पूर्णत: माफ केली जात असे. त्यासाठी अर्जदारानं आपल्या फी माफीच्या अर्जात त्याला फी माफी का करावी याची संयुक्तिक कारणं देणं आवश्यक असे. त्या संस्थेतले वरिष्ठ कारकून, श्री. राजकुमार यांना याबाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार संस्थेने दिले होते. नरेंद्रनाथांचा वर्गमित्र हरिदास चट्टोपाध्याय अतिशय बिकट आर्थिक परिस्थितीत होता. परिक्षेआधी फी भरणं त्याला अशक्य होतं. त्याला कॉलेजची तसेच परिक्षा फी यापैकी काहीही देणं शक्य नव्हतं. नरेंद्रने त्याला मदतीचे आश्वासन दिले.

एक दोन दिवसांनी श्री. राजकुमारांच्या समोर आपली फी तसेच राहिलेली रक्कम भरण्यासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडाली. त्या गर्दीतून वाट काढत नरेंद्र श्री. राजकुमारांपाशी पोहोचला आणि त्यांना म्हणाला, "महाशय, हरिदासला त्याची फी भरणं शक्य नाही. कृपा करुन त्याची फी माफ कराल का? आपण जर त्याला परिक्षेला बसू दिलत तर तो उत्तम गुणांनी पास होईल नाहीतर बिचाऱ्याचे फारच नुकसान होईल." त्यावर श्री. राजकुमार

म्हणाले, "उगाच आगाऊपणे हरिदासची शिफारस तू करण्याची काही एक गरज नाही. आधी स्वत:चे काय होते ते बघ. त्याने त्याची साचलेली फी पूर्ण भरल्याशिवाय मी काही त्याला परिक्षेला बसू देणार नाही." अशा रीतीने झिडकारल्यामुळे नरेन्द्रनाथ तिथून निघून गेला. बिचारा हरिदास निराश झाला. पण नरेंद्रने त्याची समजूत घातली, "अरे, तू एकदम निराश का होतोस? त्यांना असं लोकांना झिडकारायची सवयच आहे. मी सांगतो तुला, मी यातून नक्कीच काहीतरी मार्ग काढेन. तेव्हा तू चिंता करु नकोस."

त्यानंतर कॉलेज सुटल्यावर घरी न जाता नरेंद्रने श्री. राजकुमार ज्या अफूच्या अड्ड्यावर अफू प्यायला जात असत तो अड्डा शोधून काढला. संध्याकाळच्या सावल्या जशा गडद होऊ लागल्या तसे राजकुमार चोर पावलांनी अफूच्या अड्ड्याकडे जाताना दिसले. अचानक नरेंद्र त्यांचा मार्ग अडवून उभा ठाकला. नरेंद्रला अशा ठिकाणी भलत्या वेळेला बघून राजकुमार चकित होऊन बुचकाळ्यात पडले. पण आपला गोंधळ न दाखवता शांतपणे त्यांनी नरेंद्रला विचारलं, "काय रे दत्त? काय झाले? तू आणि इथे?" नरेंद्रने पुन्हा एकदा हरिदासची फी माफीची मागणी राजकुमारांपुढे मांडली. त्यांना हे ही सांगितले की जर त्यानं केलेली विनंती राजकुमारांनी अव्हेरली तर दुसऱ्या दिवशी साऱ्या कॉलेजला ते अफूच्या अड्ड्यावर जातात ही बातमी तात्काळ कळेल. "अरे, एवढं चिडायला काय झालं?" राजकुमार म्हणाले, "तुला जे हवं ते होईल. मी कधी तुझ्या विनंतीकडे दुर्लक्ष करीन का?" कॉलेजची राहिलेली सर्व फी माफ करण्याचे त्यांनी कबूल केले. परंतु परीक्षा फी मात्र हरिदासला भरावी लागेल हे त्यांनी सांगितले. नरेंद्रने ते कबूल केले आणि तो तेथून निघाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदयाआधीच नरेंद्रनाथ हरिदासच्या घरी गेला आणि दरवाजा ठोकून म्हणाला, "ए हरिदास, चल आता खुश हो! तुझं काम झालं! तुला आता कॉलेजची राहिलेली फी नाही भरावी लागणार." नंतर त्याने आदल्या संध्याकाळी घडलेला प्रसंग अगदी नाट्यपूर्ण रीतीने नकला करुन सगळ्यांना सांगितला आणि सर्वजण हास्यकल्लोळात बुडून गेले.

नंतरच्या आयुष्यातही गरीबांबद्दल नरेंद्रनाथ म्हणजेच स्वामी विवेकानंद कशी सहानुभूती दाखवत ते पुढील उदाहरणावरुन स्पष्ट होते.

एकदा स्वामीजी रेल्वेने प्रवास करत होते तेव्हा उकडलेले चणे विकणारा एक गरीब मुसलमान त्यांच्या डब्यात चढला. त्याला पाहिल्याबरोबर स्वामीजींनी त्यांच्याबरोबर असणाऱ्या ब्रह्मचाऱ्याला चणे खाल्ल्याने कसा फायदा होतो ते सांगायला सुरुवात केली. "हे बघ! चणे खाल्ल्याने खूप ताकद येते." मग त्या चणेवाल्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, "आपण थोडे चणे खाऊया का?" त्या ब्रह्मचाऱ्याला स्वामीजींचा स्वभाव चांगला माहीत होता. त्याला लगेच लक्षात आले की स्वामीजींना त्या गरीब चणेवाल्याला मदत करायची आहे. त्यांना काही चणे खायचे नव्हते. त्याने लगेच त्या चणेवाल्याकडून एक आण्याचे चणे घेऊन त्याला चार आणे दिले. स्वामीजींची नजर तीक्ष्ण होती. त्यांनी ब्रह्मचाऱ्याला विचारले. "तू किती पैसे दिलेस?" त्या ब्रह्मचाऱ्याने सांगितले, "चार आणे." त्यावर स्वामीजी प्रेमाने त्याला म्हणाले, "अरे बाळा, फारच कमी पैसे दिलेस तू. त्याच्या घरी बायका मुलं आहेत. त्यांचंही पोट भरायचं आहे. "त्याला एक रुपया दे." ब्रह्मचाऱ्याने तात्काळ स्वामीजींची सूचना अमलात आणली.

• • •

*मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## ३. जन्मजात नेता

लहान वयात देखील नरेंद्र आपल्या सवंगड्यांमध्ये त्यांचा म्होरक्या म्हणून वावरायचा. प्रसंग आला की तो त्यांचा प्रमुख म्हणून पुढे होई. एकदा असाच एक प्रसंग आला. मकर संक्रांतीचा दिवस होता. सुट्टीचा दिवस. बंगालमध्ये ह्या दिवशी मुले गंगेची पूजा करतात. त्या दिवशी गंगेत स्नान करणे मंगलमय समजतात. उत्सव साजरा करायचा, असे नरेनने आपल्या मित्रांना सांगितले. वडिलांची परवानगी घेतली आणि खर्चासाठी पैसेही घेतले. मुलांचा गट तयार झाला. वडिलांनी त्याच्या खाजगी शिक्षकांना म्हणजेच गुरु महाशयांना, मुलांना गंगामातेची गाणी शिकवायला सांगितले. त्या दिवशी दत्तांच्या वाड्यापासून मुलांची एक मिरवणूक निघाली. नरेन मिरवणुकीत सर्वात पुढे होता. पताका, फुले, हार वगैरे घेऊन सर्वजण गंगेकडे गाणी म्हणत रस्त्यांमधून जाऊ लागले. गंगातीरी पोहोचल्यावर त्यांनी "गंगेची करा पूजा" हे सर्व बंगाली मुलांना पाठ असलेले गीत सामुहिकपणे म्हटले आणि फुले व हार गंगेच्या प्रवाहात सोडले. त्या दिवशी संध्याकाळी पुन्हा सारेजण गंगातीरावर जमले. केळीच्या पानांच्या छोट्या नावांवर त्यांनी दिवे बांधून त्या प्रवाहात सोडल्या. ते दृश्य किती सुंदर होते! अहाहा! गंगेच्या समग्र पात्रावर दिव्यांच्या नावा पसरल्या होत्या. नरेनचा चमू त्या तिथे जमलेल्या गर्दीचा एक छोटासाच भाग होता. गंगेचा तो प्रवाह असंख्य दिव्यांनी लखलखत होता.

आपल्या जीवनप्रवाहातही स्वामीजी जेथे गेले तेथे आपल्या समकालीनांमध्ये एक अजोड नेता म्हणून पुढे आले. गुरुदेव श्रीरामकृष्णांच्या पायाशी ऐन तारुण्यात जमा झालेल्या सर्व शिष्यांमध्येही ते अग्रेसर होते.

पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशातही आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर ते सर्वांच्या पुढे राहिले. लहानपणी आपल्या सोबत्यांचे तर ते राजाच होते. "मी राजांचाही राजा-सम्राट आहे." असे म्हणत ते तळमजल्याहून जिना चढत पूजागृहापर्यंत जायचे आणि तेथे राजासारखे बसायचे. आपल्या दोन मित्रांना महामंत्री आणि सेनापती व्हायला सांगायचे आणि खालच्या पायऱ्यांवर उभे करायचे. आणखी चारपाच जणांना जिन्याच्या प्रत्येक पायरीवर मांडलिकांसारखे उभे राहायला सांगायचे. त्या पलिकडे दरबारातील इतर मंडळी बसायची. अशा तऱ्हेने नरेनचा दरबार सुरु व्हायचा. राजेलोक, त्यानंतर राज्यातले उच्च अधिकारी आणि दरबारातील इतर लोक क्रमाने सम्राटापुढे येऊन पौर्वात्य पद्धतीनुसार दंडवत प्रणाम करुन म्हणत, "हे सूर्यवंशी पुत्रा, समुद्रवलयांकित पृथ्वीच्या स्वामी, हे धर्माचे पालन करणाऱ्या सम्राटा, तुला प्रणाम असो!" ही औपचारिकता झाल्यावर सम्राट आपल्या साम्राज्याची चौकशी करी - आणि प्रजेची गाऱ्हाणी ऐकत असे. कधी एखाद्या गुन्हेगाराला पेश करुन त्याच्या गंभीर गुन्ह्याची माहिती दिली जाई. पुराव्यानिशी गुन्हा सिद्ध झाल्यावर महाराज म्हणत, "शिपायांनो, डोके उडवा याचे!" राजाज्ञेबरोबर दहा शिपाई पुढे सरसावत आणि गुन्हेगाराला ताब्यात घेत. असा नरेन, सम्राटाला शोभेल अशा रीतीने न्यायवितरणाचे कार्य करीत असे. कोणी किंचित जरी उद्धटपणा केला तर लगेच नरेनच्या कपाळावर नापसंतीची आठी उमटत असे.

आम्ही अगोदरच सांगितले आहे की नरेन आपल्या सवंगड्यांचा म्होरक्या होता. खरेतर नेतृत्व त्याच्या रक्तातच होते. नेतृत्व म्हणजे स्वार्थत्याग हे त्यानी आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातच दाखवून दिले. सहा वर्षांचा असताना एकदा छोटा नरेन नात्यातल्या एका लहान मुलाला सोबत घेऊन चारहाकच्या जत्रेला गेला. ह्या जत्रेत शिवाची पूजा होत असते. जत्रेत नरेनने काही छोट्या शिवमूर्ती विकत घेतल्या. संध्याकाळ झाल्यावर ही दोन मुले घराकडे यायला निघाली. गर्दीमुळे त्यांची चुकामूक झाली. तितक्यात नरेनला एक घोडागाडी भरधाव येताना दिसली. नरेनला वाटले आपला सोबती मागेच असेल. पण पाहतो तो काय! तो मुलगा रस्त्याच्या मधोमध गांगरुन गेल्यासारखा उभा

होता. आपल्या हातातल्या मूर्ती डाव्या खाकेखाली धरून डोळ्याचे पाते लवते न लवते तोच नरेन पुढे झेपावला आणि स्वत:च्या जीवाची पर्वा न करता, त्याने त्या लहान मुलाला आपल्याजवळ खेचले. क्षणाचा विलंब झाला असता तर तो मुलगा घोड्यांच्या टापांखाली चिरडला गेला असता! आजूबाजूचे लोक आश्चर्याने थक्क झाले. हे संकट इतके अकस्मात उभे ठाकले होते की त्या लहान मुलाच्या मदतीला कोणी जाईल अशी शक्यताच नव्हती. मुलाला वाचवल्याबद्दल काहींनी नरेनची पाठ थोपटली तर काहींनी त्याला शुभाशीर्वाद दिले. घरी आल्यावर आईला जेव्हा कळले तेव्हा तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. ती म्हणाली, "बाळा, असाच पुरुषासारखा वाग!"

नरेनमधील आत्मबलिदानाच्या ह्या भावनेमुळेच तो आपल्या सवंगड्यांमध्ये आदरणीय ठरत होता. याचा परिणाम सर्व सवंगड्यांच्या मनावर इतका पक्का झाला की पुढे महाविद्यालयात गेल्यानंतर ते अत्यंत महत्वाच्या विषयात देखील नरेन म्हणेल ते करायला तयार असत.

आपल्या वर्गबंधूंमध्ये नरेन अत्यंत आपुलकीने मिसळत असे. शाळेतील मोकळ्या वेळेत नरेन त्यांच्याबरोबर खेळत असे, गाणी म्हणत असे, किंवा नकला करुन त्यांना हसवत असे, परंतु त्याने कधीही कोणाला दुखावले नाही. अशा वागण्यामुळे सारेचजण त्याच्या जवळ येत आणि त्याच्याशी आपलेपणाने वागत. अवघ्या पाच मिनिटात नरेन कुणाचेही मन जिंकू शकत असे. बोलण्यात तो कोणालाही जिंकत असे, पण कुणीच त्याला जिंकू शकत नसे. नरेनला समयसूचकतेचे कमालीचे भान असायचे. ऐनवेळी उद्भवलेल्या कोणत्याही प्रसंगाला तो तोंड देऊ शकत असे. तो कधीच दुर्मुखलेला नसे. दुसऱ्यांना हसतमुख कसे ठेवायचे हे त्याला चांगले माहीत होते. आपल्या सर्व वर्गबंधूंना तो मोहवून टाकी.

नरेन आपल्या मित्रांना कलकत्यातील अनेक प्रेक्षणीय ठिकाणे पाहायला नेई. कधी एखादे उद्यान, तर कधी ऑक्टरलोनी मॉन्युमेंट, तर कधी वस्तुसंग्रहालय. एकदा कलकत्त्यातल्या मेटियाबुरुज या

उपनगरात नवाबाच्या प्राणीशास्त्रीय उद्यानात तो आपल्या मित्रांना बोटीने घेऊन गेला. परत येताना एका मुलाची प्रकृती बिघडली आणि बोटीतच त्याला उलटी झाली. नावाडी संतापले आणि त्या मुलांनी बोट स्वच्छ केली पाहिजे असे म्हणू लागले. मुलांनी तसे करण्याचे नाकारले. दुप्पट पैसे द्यायला ते तयार होते. परंतु त्याला नावाडी तयार नव्हते. घाटावर परतल्यावर नावाडी मुलांना उतरु देत नव्हते. त्यांना धमकी देऊ लागले. नावाडी मुलांना शिव्या घालत असताना नरेनने बोटीतून किनाऱ्यावर उडी मारली आणि जवळच फिरत असलेल्या दोन ब्रिटीश सैनिकांना सारी कथा आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत सांगितली. आपला छोटासा हात त्यांच्या हातात देत त्याने त्यांना बोटीजवळ आणले. सैनिकांच्या सारे लक्षात आले. त्यांनी नावाड्यांना धमकावले आणि मुलांना सोडून द्यायला सांगितले. ब्रिटीश सैनिकांना घाबरुन नावाड्यांनी मुलांना मुकाट्याने सोडून दिले. नरेनचा निर्भयपणा सैनिकांना आवडला व त्याला ते आपल्याबरोबर नाटक पाहायला येतो का असे विचारु लागले. परंतु नरेनने त्यांचे आभार मानले आणि त्यांचा निरोप घेतला.

नरेनबद्दलची आणखी एक मजेदार घटना तो अकरा वर्षाचा असतानाची आहे. ही घटना सम्राट सातवे एडवर्ड भारत भेटीला आले तेव्हाची आहे. त्यावेळी 'सायरॅपिस' नावाची ब्रिटीश युद्धनौका कलकत्ता बंदरात आली होती. ती युद्धनौका पाहाण्यासाठी प्रवेशपत्र मिळवणे आवश्यक होते. ते मिळवावे म्हणून त्याच्या मित्रांनी नरेनला गळ घातली. यासाठी एका इंग्रज अधिकाऱ्याला भेटणे आवश्यक होते. हाती अर्ज घेऊन नरेन जेव्हा त्या अधिकाऱ्याकडे गेला, तेव्हा त्याच्या चपराशाने, तो वयाने लहान असल्यामुळे त्याला आत जाण्यापासून रोखले. आता काय करावे या विचारात नरेन बाजूला उभा होता. आतमध्ये जाणारे लोक पहिल्या मजल्यावरील खोलीत जात असल्याचे नरेनने पाहिले. त्याच खोलीत पास देण्याचे काम चालू असेल हे त्याच्या लक्षात आले. तेथे जाण्यासाठी आणखी एखादा मार्ग आहे काय याचा शोध घेत असतांना त्याला मागील बाजूस एक जिना असल्याचे दिसले. कुणाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीने तो त्या जिन्याने वर गेला. दारावरील पडदा दूर सारून तो आत

गेला. रांगेत उभे राहून त्याची पाळी येताच त्याच्या प्रवेशपत्रावर सही झाली. कुणीही काहीही विचारले नाही. खोलीतून बाहेर पडताना त्या चपराशाने आश्चर्यचकित होऊन म्हटले, "तू आत कसा गेलास?" त्यावर नरेन म्हणाला, "वा! मी जादूगर आहे."

नरेनमध्ये लहान वयातच एक महान व्यक्ती बनण्याची लक्षणे आढळत होती. नरेन जवळपास चौदा वर्षांचा असताना त्याने एक नाट्यप्रयोग उधळण्यापासून वाचवला. नाटक सुरळीत चालू होते. त्यावेळी काम करणाऱ्या नामांकित नटाला काही आरोपाखाली अटक करायला वॉरंट घेऊन बेलिफ आला. रंगमंचावर जाऊन तो म्हणाला, "कायद्याच्या नावाने मी तुम्हाला अटक करीत आहे." त्याक्षणी प्रेक्षागृहातून एक आवाज उठला, "रंगमंचाबाहेर व्हा! थांबा. नाटक संपू द्या. तुम्ही प्रेक्षकांना का त्रास देत आहात?" आवाज धारदार होता. त्यात एक जरब होती. तो नरेन होता. त्याच्या समर्थनात अनेक लोक उद्गारले – "मंचावरून उतरा! मंचावरून उतरा!" बेलिफ गांगरून मागे सरसावला. नरेनच्या भोवती असलेल्या लोकांनी त्याची पाठ थोपटली. काही लोक म्हणाले, "तू नसतास तर आमचे तिकीटाचे पैसे वाया गेले असते."

ह्या आणि अशाच काही घटनांवरुन नरेनचे धीट, उदार आणि कोमल व्यक्तिमत्व दिसून येते. त्याचबरोबर त्याची समयसूचकता, विस्मित करणारी उर्जा, धाडसी वृत्ती आणि मनोरंजनाची आवड दिसून येते.

या साऱ्या गुणांमुळे नरेन नेहमीच नेता होता आणि नेताच राहिला.

• • •

*मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)*

*विशेष सूचना :*

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## १. वात्सल्यमूर्ती माता

पूज्य माताजी - श्रीसारदादेवी यांचा जन्म २२ डिसेंबर १८५३ साली बंगाल मधील बांकूडा जिल्ह्यातल्या जयरामबाटी ह्या गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत गरीबीत, खेड्यातल्या साध्यासुध्या वातावरणात गेले. बालवयात सहाव्या वर्षी श्रीरामकृष्णांशी त्यांचा विवाह झाला. श्रीसारदादेवींना साऱ्या जगभर पूज्य माताजी म्हणून मान दिला जातो. श्रीरामकृष्णांनी श्रीसारदादेवींची जगदंबा ज्ञानाने पूजा केली होती. श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर श्रीसारदादेवींनी जगभरातील हजारो संन्यासी तसेच गृहस्थांना मार्गदर्शन करुन त्यांचे आध्यात्मिक जीवन घडविले आहे.

पूज्य माताजी म्हणत – "ज्याचे मन शुद्ध आहे त्याला प्रत्येक वस्तू शुद्धच दिसते."

माताजींचे जीवन म्हणजे मानवी आणि दैवी गुणांचे एक सुरेख मिश्रण होते. त्यांची केवळ आध्यात्मिक शक्ती नव्हे तर त्यांच्यातील मानवी गुण त्यांच्या चारित्र्याला जगामध्ये अनन्यसाधारण स्थान प्राप्त करुन देण्यास पर्याप्त होते. भारतीय नारीचे परिपूर्ण रुप म्हणजेच श्रीसारदादेवी. त्यांची कोणतीही कृती भव्य दिव्य अशीच होती. त्यांच्या कृतीतून नेहमीच मनाची उदारता प्रतीत होत असे. मनाचा क्षुद्रपणा किंवा कोतेपणा दर्शविणाऱ्या कोणत्याही कृतीशी त्यांचा कधीही चुकूनसुद्धा संबंध येत नसे. त्यांची सर्वसाधारण वागणूकसुद्धा इतरांपेक्षा कितीतरी पटीने सौजन्यपूर्ण होती. त्यांचा उदार दृष्टीकोन त्यातून जाणवत असे. त्यांचे जीवन इतरांसाठी आदर्श होते. त्यांच्या कृतीत किंवा वागणुकीत लेशमात्र अपूर्णता नव्हती.

श्री सारदादेवींच्या चारित्र्यातील अत्यंत प्रभावी घटक म्हणजे त्यांचं वात्सल्य. ह्या घटकापुढे इतर सारे गुण निष्प्रभ ठरत. त्या इतर काहीही असोत, परंतु प्रत्येकाला त्यांच्यामध्ये आपली आईच आढळायची. उलट जन्मदात्री आईपेक्षा त्यांचं प्रेम अधिक प्रभावी होतं. बालपणीच आई गमावलेल्या आणि मातृप्रेमाच्या अनुभवाला मुकलेल्या अनेक तरुणांना माताजींच्या संपर्कात आल्यानंतर ती त्रुटी भरून निघाल्यासारखे वाटे. कित्येकांना त्यांच्या मातृप्रेमाचा परिसस्पर्श झाल्यावर जीवनात आणखी काहीही मिळवण्याची इच्छा राहत नसे. माताजींचं प्रेमच त्या तरुणांना इहलोकी सुरक्षा व त्यानंतर मुक्ती देण्यासाठी पुरेसे वाटे. माताजींमध्ये वसत असलेल्या आध्यात्मिक शक्तीविषयी जाणून घेण्याची गरज त्यांना भासत नसे.

माताजींच्या वागणुकीत असे काही होते की त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांच्या मनातील भीती नष्ट होऊन जाई. त्या जेव्हा दीक्षा देत तेव्हा कदाचित दीक्षित व्यक्ती त्यांच्याविषयीच्या आदराने आणि त्यांच्या आध्यात्मिक व्यक्तिमत्वाने भारावून जाई; परंतु दीक्षा आटोपल्यावर माताजी त्याला आपल्या हाताने गोड खाऊ भरवीत असत तेव्हा त्याला त्याच्या स्वतःच्या घरी आपल्या जन्मदात्री आईबरोबर असल्यासारखे वाटे. वेळ पडल्यास अनेकदा त्या आपल्या तरुण शिष्यांना आपले कपडे व कांबळे देत. कधी कधी त्या शिष्यांच्या मनात आपण पूज्य माताजींच्या वस्तू वापरून त्या अपवित्र तर करीत नाही ना? अशी शंका येई परंतु माताजींच्या स्वाभाविक मातृप्रेमाचा आविष्कार बघून ते निःशंक होत. आईने दिलेल्या वस्तू वापरायला मुलं कधी संकोच करतात का?

जयरामबाटी येथे माताजी शिष्यांसाठी स्वयंपाक करीत, त्यांना जेवायला देत, त्यांची उष्टी काढत व जेवायची जागा सारवत. दूरवरुन शिष्य येत. १-२ दिवस राहत, परंतु माताजींच्या विषयी भावनिक जवळीक इतकी निर्माण होई की तेथून परतताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत. माताजीही त्यांना दूरवर जाईपर्यंत न्याहाळत उभ्या राहायच्या. त्यांचेही डोळे वात्सल्याने भरून येत. एकदा त्यांच्याबरोबर राहणारा एक तरुण संन्यासी काही कामानिमित्त बाहेर गेला होता. परत यायला त्याला अगदी तिन्हीसांज झाली. पण तो परत

येईपर्यंत माताजी जेवल्या नाहीत. मुलगा जेवला नसताना आई जेऊ शकेल का? जेव्हा त्या शिष्याने हे पाहिले तेव्हा तो भावनेने भारावून गेला. अगदी आपली स्वत:ची आई सुद्धा कधी कधी आपला एवढा विचार करीत नाही. त्या सार्वजनीन माता होत्या. प्रत्येक सजीवाला त्यांच्यात आपली आई दिसत असे. माताजींच्या प्रेमाला जाती, धर्म वा प्रदेशांचे कोणतेही बंधन नव्हते. पौर्वात्य, पाश्चात्य, दाक्षिणात्य तसेच उत्तरेतील अनेक लोक माताजींच्या आशीर्वादासाठी येत असत. त्या सर्व लोकांच्या भाषा माताजी बोलू शकत नव्हत्या परंतु त्यांच्या अबोल प्रेमाच्या भाषेनेच ते सर्व लोक तृप्त होत, स्वत:ला भाग्यवान समजत.

जेव्हा भगिनी निवेदिता भारतात आल्या तेव्हा हिंदू समाजात त्यांना स्थान प्राप्त करुन देण्याच्या विचाराने स्वामी विवेकानंद चिंतित झाले होते. परंतु माताजींनी त्यांना स्वत:च्या खोलीत ठेऊन घेतले. त्या काळात माताजींनी दाखविलेला हा फार उदार दृष्टिकोन होता तसेच ते फार मोठे धाड़स होते. कारण ही बातमी त्यांच्या गावाकडील नातेवाईकांना कळली असती तर त्यांना सामाजिक छळाला तोंड द्यावे लागले असते. त्या स्वत: अत्यंत सनातनी ब्राह्मण कुटुंबातल्या होत्या. आधुनिक शिक्षण त्यांना मिळाले नव्हते तरीही त्यांनी एका युरोपियन स्त्रीला आपल्या खोलीत ठेऊन घेतले. हे खरोखरच विलक्षण नाही का? आणि ते ही शंभर वर्षांपूर्वी, जेव्हा हिंदू समाज आपल्या सामाजिक रुढी पाळण्याबाबत अत्यंत कट्टर होता!

काळाच्या दृष्टीने पाहिलं तर माताजी जुन्या जमान्यातील असूनही त्यांचे मन कमालीचे आधुनिक होते. त्यांच्यातला हा गुण बघून भगिनी निवेदितांनी यथार्थपणे विचारले आहे, "त्या जुन्या पिढीतील अखेरच्या आहेत का नव्या युगाचा आरंभ?" अनेक अ-बंगाली व अ-भारतीय लोक माताजींकडे येत. परंतु माताजींचे अकृत्रिम स्वाभाविक स्नेह बघून त्यांचा आप-पर भाव सहज निघून जाई. एकदा निवेदितांकडे असताना माताजी ईस्टरचे संगीत ऐकताना इतक्या तल्लीन झाल्या की सर्वांना आश्चर्य वाटले की कोणतीही पाश्चात्य भाषा कळत नसताना त्या पुनरुत्थानाच्या घटनेत इतक्या कशा रममाण झाल्या!

मताजींची बुद्धी अतिशय तीक्ष्ण होती. तसेच त्यांचे व्यावहारिक ज्ञानही यथार्थ होते. त्यामुळे कधी कधी त्यांच्या विचारक्षेत्राच्या बाहेर असणाऱ्या घटनांवरही त्या योग्य मत देऊ शकत. पहिल्या महायुद्धाच्या काळात एक शिष्य, राष्ट्राध्यक्ष विल्सन, सर्व जगात शांतता नांदावी आणि पुन्हा युद्ध होऊ नये यासाठी कसे प्रयत्न करीत होते, ते समजावून सांगत होता. त्यावर माताजी शांतपणे म्हणाल्या, "ते सारे वरवरचे ओठावरील बोलणे. हृदयापासून नाही." एकदा एक शिष्य माताजींना ब्रिटिश राजवटीमुळे भारतीयांना कोणकोणत्या सुखसोई मिळाल्या ह्याचे वर्णन करुन सांगत होता. त्यावर त्या उत्तरल्या, "परंतु लोकांची गरीबी दिवसेंदिवस वाढत चालली आहे हे तर खरं ना!"

कधी कधी निम्न जातीतील लोकही माताजींकडे जयरामबाटीला येत. परंतु माताजींचा समभाव कधीही ढळत नसे. फक्त इतरांच्या समोर वागताना ती मंडळी योग्य ती काळजी घेत आहेत ना ह्याकडे त्या लक्ष देत. कारण त्या काळात खेड्यात जातीभेद कटाक्षाने पाळला जात असे.

एकदा अशीच एक कामकरी महिला एका भक्ताने पाठविलेल्या भाज्या घेऊन माताजींकडे आली. त्या रात्री तिला तिथेच मुक्काम करावा लागला. ती रात्री तापाने फणफणली. त्यातच तिला उलट्याही झाल्या. दुसऱ्या दिवशी इतर कुणी उठण्यापूर्वी माताजींनी त्या बाईचे घाण झालेले अंथरूण पांघरुण स्वत: स्वच्छ धुतले. इतर कुणी त्या बाईला ओरडू नये म्हणून हे सारे कष्ट माताजींनी केले.

मजूर म्हणून कामावर असलेला एक मुसलमान एके दिवशी माताजींच्या घरी जेवायला बसला. घराच्या ओसरीवरच तो बसला होता. माताजींची भाची नलिनी त्याला वाढत होती. त्याला स्पर्श केल्याने आपली जात भ्रष्ट होईल ह्या भीतीने नलिनी त्याच्या ताटात दूरूनच अन्न टाकत होती. हे पाहताच माताजींनी तिची चांगलीच कानउघडणी केली आणि त्याला स्वत: वाढले. त्याचं जेवण झाल्यावर त्यांनी स्वत: त्याचं उष्टं काढलं आणि ती जागा स्वच्छ केली. ते पाहून नलिनीला धक्काच बसला आणि ती उद्गारली, "हे काय करताहात तुम्ही? अशानं तुमची जात बुडणार नाही का?"

कित्येक निम्न जातींच्या माणसांना माताजींनी दीक्षा दिली. दीक्षा झाल्यावर ती मंडळी माताजींच्या खोलीतच जेवत. माताजी स्वत: त्यांचं उष्ट काढीत, त्यांची ताटं घासत. एरवी त्या लोकांनी स्वत:ही याला विरोध केला असता कारण एका ब्राह्मण व्यक्तीकडून निम्न जातीच्या माणसांनी सेवा करुन घेणे हे महापाप समजलं जाई. परंतु त्या लोकांना अगदी मनापासून वाटायचं की माताजी म्हणजे आपली खरीखुरी आई आहे तेव्हा आईने आपल्या मुलांची सेवा केली तर त्यात काय बिघडलं. ते अगदीच स्वाभाविक नाही का?

माताजींना दारिद्र्याचे, दु:खाचे चटके झेलणाऱ्या माणसांविषयी अत्यंत कळवळा होता. रामकृष्ण मिशनने सुरु केलेल्या सेवाकार्यात त्या खूप रस घेत. जर का एखादा मठातील साधू त्यांच्याकडे येऊन सांगू लागला की ह्या सेवा कार्यामुळे त्याच्या ध्यान-धारणेत अडथळा येतो तर माताजी त्या गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष करीत. हेही श्रीठाकुरांचेच काम आहे, असे त्याला सांगत. जयरामबाटी येथे असताना त्या आपल्या शेजाऱ्यांच्या कामामध्ये सहानुभूतीपूर्वक लक्ष देत. माताजी त्यांच्यासाठी एक शक्तीस्रोत होत्या. माताजींची करुणा आणि वेळीच केलेल्या सहाय्यामुळे त्यांच्या दु:खाचे  ओझे हलके होत असे.

काही वेळा इतर भक्तांची कुरकूर आणि विरोध डावलून, वाट चुकून, वाईट मार्गाला लागलेल्या व्यक्तींना सुद्धा माताजींचं प्रेम आणि आशीर्वाद न चुकता मिळत. एकदा त्या परखडपणे म्हणाल्या, "माझा मुलगा घाणीत लोळला तरी तो माझाच आहे." आणखी एका प्रसंगी त्या म्हणाल्या, "मी जशी सज्जनांची माता आहे तशीच दुर्जनांचीही माता आहे." एकदा पाऊल वाकडे पडल्यामुळे पश्चातापाने ग्रस्त झालेली एक बाई माताजींना भेटायला कलकत्यास आली. परंतु तिला त्यांच्या खोलीत प्रवेश करायचं धाडस होईना. माताजींच्या ध्यानात सारे काही आले. त्यांनी स्वत: तिला आपल्या खोलीत आणले, प्रेमाने कुरवाळले आणि दीक्षा देखील दिली. तिला धैर्य आणि सांत्वना देत त्या म्हणाल्या, "तुझ्या हातून एखादी चूक झाली तर त्यात काय? तुला पश्चाताप होत असल्याने तुझं पाप त्यात धुऊन गेलं." त्या महिलेच्या जीवनात पुढे कायापालट झाला.

जरी कित्येक चुका केलेल्या माणसांना माताजींचं वात्सल्य मिळत असले तरी त्यांचे प्रेम त्यांना पुढे चुका करण्याचं स्वातंत्र्य देत नसे. त्यांच्या वागणुकीत थोडीशी जरी चूक झाली तरी ती माताजींच्या सहज लक्षात येई. जरी त्या नेहमी ते दाखवून देत नसत तरी जरूर पडल्यास अशा व्यक्तींची कानउघडणी करण्यास त्या मागेपुढे पाहात नसत. भगव्या वस्त्रांचा दुराभिमान वाटणारा संन्यासी असो किंवा वयाने लहान असणाऱ्या संन्याशाप्रति आदर न दाखवणारा गृहस्थ असो, त्या दोघांनाही माताजी समान चेतावणी देत आणि अशा वागण्याने पुढे कोणता धोका उद्भवू शकतो ह्याबाबत त्यांना समजावत. गरज पडल्यास त्या कठोर सुद्धा होत. एखाद्याला जर असं वाटत असेल की आपण आता प्रेममय माताजींचा आश्रय घेतला आहे म्हणून काहीही करु शकतो तर ही त्याची धारणा चुकीची ठरे. अशा व्यक्तींना प्रसंगी त्या आपल्या ठिकाणाहून तात्काळ निघून जायचा आदेश देत. अर्थात असे प्रसंग फार क्वचित, अगदी क्वचित येत.

माताजींच्या प्रेमाच्या सावलीत आपली वर्तमान आणि भविष्य काळातील दु:खे लुप्त होतील अशी खात्री एखाद्या शिष्याला वाटे. पण ज्यांची जबाबदारी त्यांनी आपल्यावर घेतली होती अशा व्यक्तींसाठी त्या किती विचार करीत ! त्यांच्या म्हातारपणी, आजारी असताना देखील त्या पुष्कळसा वेळ प्रार्थनेत आणि ध्यानात घालवीत. त्यांना जेव्हा विचारण्यात येई की कोणतीही आध्यात्मिक साधना करण्याची त्यांना काय गरज, तेव्हा माताजी उत्तर देत की त्या आपल्या आश्रयास आलेल्यांच्या वतीने ध्यान आणि प्रार्थना करीत होत्या. म्हणूनच माताजींचं प्रेम संपादन केल्यानंतर काही शिष्यांना जप-ध्यान करण्याची अजिबात गरज भासत नव्हती ह्यात कोणतेही नवल नाही. एकदा जेव्हा एका स्त्री शिष्येने त्यांना विचारले की तिने त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीने पहावं, तेव्हा त्या म्हणाल्या, "मला स्वत:च्या आईसमान दृष्टीनं पाहिलं तरी पुरे झालं." एखाद्या शिष्याने कठोर तपस्या करताना त्याला शारीरिक कष्ट झाल्यास माताजींच्या मातृहृदयास ते असह्य होई. अशा तरुण साधकांना त्यांच्या अतिरेकापासून त्या नेहमी सावध करत. पण त्याचबरोबर आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग आरामशीर जीवनाबरोबर सुसंगत आहे असे समजणाऱ्या आळशी

व्यक्तींमध्ये स्फूर्ती कशी जागृत करावी हेही माताजींना चांगलेच माहीत होते.

माताजींच्या आईला सुरुवातीच्या काळात दु:ख होत असे की त्यांच्या मुलीचं लग्न एका अर्धवेडा वाटणाऱ्या सांसारिक जीवन जगत नसलेल्या माणसाशी लावून दिल्याने त्यांच्या सारदेला आपल्या मुलांकडून 'आई' ही हाक ऐकण्याच्या सुखाचा अनुभव मिळणार नाही. त्यावर श्रीरामकृष्ण त्यांना म्हणाले, "प्रिय सासूबाई, तुम्ही अजिबात वाईट वाटून घेऊ नका. तुमच्या मुलीला 'आई' हाक मारून भंडावून सोडणारी इतकी मुलं मिळतील की ती त्रासून जाईल." त्यांची भविष्यवाणी किती खरी ठरली! आपणास माहीत नाही की पूज्य माताजींना आपल्या मुलांचा कधीही कंटाळा आला किंवा नाही, परंतु हे सत्य आहे की पृथ्वीतलावर कोणत्याही मातेला 'आई' म्हणून साद घालणारी इतकी मुलं नव्हती आणि त्यांच्या संतानांचे आपल्या आईवरील प्रेम तरी किती महान! एक भक्त तर त्यांना चक्क म्हणाला, "तुम्हाला माझ्यासारखे अनेक पुत्र असतील परंतु मला तुमच्यासारखी दुसरी आई नाही!"

आपल्या पुराणामध्ये आणि इतिहासामध्ये उत्तम कोटीच्या आदर्श गुरु, थोर माता आणि पत्नी म्हणून गाजलेल्या स्त्रिया मिळतील, परंतु ह्या सर्व गुणांचा समन्वय केवळ पूज्य माताजी श्रीसारदादेवी ह्यांच्यामध्येच आढळतो.

पूज्य माताजींच्या कार्याचा हेतू स्पष्ट करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, "शक्ती शिवाय ह्या जगात सृजन शक्य नाही. आपला देश जगातला सर्वात दुबळा आणि मागासलेला का आहे? कारण इथं शक्तीचा अपमान केला जातो. पूज्य सारदामातेचा जन्म भारतात त्या शक्तीचे पुनरुत्थान करण्यासाठी झाला आहे. त्यांना केंद्रबिंदू करुन पुन्हा एकदा गार्गी आणि मैत्रेयी ह्या जगात जन्मास येतील!"

• • •

*मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)*
*विशेष सूचना :*

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*
*२. कृपया विषयास धरून बोलावे.*
*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*
*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## २. भारताचे पुनरुत्थान

लाखो स्त्रीपुरुष पावित्र्याच्या अग्निमंत्राची दीक्षा घेऊन व ईश्वरावरील दृढ विश्वासाचे चिलखत धारण करुन, गरीब, पतित व पददलित यांच्याविषयी असलेल्या सहानुभूतीतून प्रस्फुरित झालेल्या सिंहसदृश साहसाने समस्त भारतामधे विचरण करीत मुक्ती, सेवा, समाजाची उन्नती आणि समता यांचा मंगलमय संदेश घरोघर पोहोचवोत.

निराश होऊ नका. भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. "कर्म करण्याचा तुम्हाला अधिकार आहे, फलावर तुमचा अधिकार नाही," हे शब्द नेहमी ध्यानात असू द्या. वत्सा, कंबर कसून तयार हो. प्रभूने मला याच कार्यासाठी आणले आहे. आपल्या आयुष्यात मी नाना प्रकारचे कष्ट भोगले आहेत. प्राणाहून प्रिय असणाऱ्या आप्तस्वजनांना जवळ जवळ उपाशी मरताना मी बघितले आहे. लोकांनी माझी अवहेलना केली, माझा उपहास केला, मला ढोंगी म्हटले आणि हे सारे त्याच लोकांनी केले की ज्यांच्याविषयी माझ्या हृदयात सहानुभूती होती.

वत्सा, हे जग दु:खाचे आगर जरी असले तरी महापुरुषांच्या पक्षी ते शिक्षण देणाऱ्या एखाद्या विद्यालयासारखे आहे. ह्या जगातील दु:खांमुळेच सहानुभूती, सहिष्णुता आणि दुर्दम्य इच्छाशक्ती या गुणांचा विकास होत असतो. अवघ्या विश्वाचा जरी चक्काचूर झाला तरी ही असली इच्छाशक्ती असल्यास माणूस मुळीच डगमगत नाही. म्हणून माझी अवहेलना, माझा उपहास करणाऱ्या लोकांची मला कीव येते. त्यांचा त्यात काहीही दोष नाही.

समाजात जरी त्यांचा मोठा मानसन्मान होत असला तरी ते अगदी बालिश आहेत, खरोखरीच बालिश आहेत. त्यांचे जे अतिसंकुचित दृष्टिक्षेत्र आहे त्याच्या पलीकडे त्यांची दृष्टी मुळीच जात नाही - त्यांचे ठराविक कार्य म्हणजे केवळ खाणे-पिणे, पैसे मिळविणे आणि वंशवृद्धी करणे हेच होय, आणि त्यांचे हे सारे काम जणू घड्याळाच्या काट्याप्रमाणे नियमितपणे चालत असते. याखेरीज ते दुसरे काहीही जाणत नाहीत. ते किती सुखी आहेत! त्यांची झोप कशानेही मोडत नाही! त्यांनी मानवजीवनाविषयी जे स्वप्नाळू सिद्धान्त बनविले आहेत ते देशातील दु:ख, दारिद्र्य आणि दैन्य यांच्या हाहाकाराने कधीही ढळत नाहीत. शेकडो शतकांच्या पाशवी अत्याचारांमुळे भारतभर माजलेल्या करुण आक्रोशाचे त्यांना काहीच सोयरसुतक नाही! शतकानुशतके चालत आलेल्या ह्या मानसिक, नैतिक व शारीरिक अत्याचारांनी भगवंताची प्रतिमाच असणाऱ्या पुरुषाला केवळ भारवाही पशू आणि भगवतीचे प्रतीक असणाऱ्या स्त्रीला केवळ संतानोत्पादन करणारी दासी करुन सोडले आहे आणि संपूर्ण जीवनच विषारी बनवून टाकले आहे. या वस्तुस्थितीची हे लोक स्वप्नातदेखील दखल घेत नाहीत. परंतु सुदैवाने दुसरे असे काही लोक आहेत की ज्यांना ही वस्तुस्थिती डोळ्यांनी दिसते, ती पाहून त्यांना कळवळा येतो आणि त्यांचे हृदय त्या कळवळ्याने आक्रोश करते. ही भयंकर अवस्था दूर करण्याचेही उपाय आहेत असे त्यांना वाटते आणि ते अमलात आणण्यासाठी ते स्वत:चे प्राणदेखील अर्पण करण्यास तयार असतात. स्वर्गराज्य अशाच लोकांचे बनलेले असते.

तथाकथित श्रीमंतांवर भरवसा ठेऊन चालू नका. ते एका अर्थाने मेलेलेच आहेत असे म्हणावयास हरकत नाही. आता भरवसा तुमचाच आहे. जे गरीब आहेत, ज्यांना समाजात स्थान नाही, पण ज्यांच्या ठायी विश्वास आहे अशा तुमचाच भरवसा आहे. ईश्वरावर विश्वास असू द्या. कोणत्याही कूटनीतीचे काही प्रयोजन नाही. कूटनीतीने, कपटाने, चलाखीने काहीही साधत नसते. दु:खितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या आणि साहाय्यासाठी भगवंताची प्रार्थना करा. तुम्हाला साहाय्य मिळेल. डोक्यात हाच विचार ठेऊन आणि हृदयात

याच चिंतेचा भार बाळगून बारा वर्षे मी वणवण फिरलो. तथाकथित मोठ्या आणि श्रीमंत लोकांचे मी उंबरठे न उंबरठे झिजविले. हृदयाचे रक्त सांडीत सांडीत अर्धी पृथ्वी ओलांडून मदतीच्या शोधात मी ह्या परक्या देशात आलो. प्रभू अनंत शक्तिमान आहे, तो मला खचितच साहाय्य करील याची मला जाणीव आहे. या दूरच्या देशात उपासमारीने किंवा भयंकर थंडीने कदाचित मला मरण येईल, पण माझ्या प्रिय तरुणांनो, मी तुमच्यासाठी गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयी सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्राण पणास लावून प्रयत्न करण्याचा वारसा ठेऊन जात आहे. जा, याच क्षणी त्या पार्थसारथ्याच्या मंदिरात जा - आणि, गोकुळातील गरीब गुराख्यांचा जो परम मित्र होता, खालच्या जातीच्या गुहकाला आलिंगन देण्यात ज्याला मुळीच संकोच वाटला नाही, बुद्धावतारात ज्याने सरदार-मानकऱ्यांचे निमंत्रण बाजूला सारुन एका वेश्येचे आमंत्रण स्वीकारले व तिचा उद्धार केला त्या पार्थसारथ्याला भक्तिपूर्वक साष्टांग प्रणाम करा, त्याला शरण जा. जे गरीब आहेत, जे दीन आहेत, जे दुःखी आहेत, ज्यांच्यावर भगवंताचे सर्वाहून अधिक प्रेम आहे आणि ज्यांच्या उद्धारासाठी ते निरनिराळ्या युगात अवतरत असतात, त्यांच्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करा, आपल्या संपूर्ण जीवनाचे बलिदान करा. हे जे तीस कोटी भारतवासी दिवसेंदिवस खाली खाली जात आहेत त्यांना वर आणण्यासाठी, त्यांचा उद्धार करण्यासाठी आपले सारे जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा.

हे काही एका दिवसात होणारे काम नाही आणि हा मार्ग भयंकर काट्याकुट्यांनी भरलेला आहे. परंतु ज्याने पार्थाचे सारथ्य केले तो आमचाही सारथी होईल हे आम्हाला ठाऊक आहे. त्याचे नाव स्मरुन, त्याच्यावर निःसीम विश्वास ठेवून शेकडो हजारो वर्षांपासून साचत आलेल्या भारताच्या दुःखांच्या ढिगाला आग लावून द्या, तो भस्मसात होईलच होईल. या, बंधूंनो, ह्या परिस्थितीला धैर्याने तोंड द्या. हे कार्य किती महान आहे, किती उदात्त आहे! आपली शक्ती जरी अगदी अल्प असली तरी, आपण ज्योतिःस्वरुप ईश्वराचे पुत्र आहोत. ईश्वरकृपेने आपण यशस्वी होऊच होऊ. ह्या संग्रामात

शेकडोजण मृत्युमुखी पडतील, पण पुन: शेकडोजण त्यांची जागा घेतील. मी ह्या देशात कदाचित विफल होऊन मरुनही जाईन, पण दुसरा कुणीतरी माझ्या कार्याचा भार घेईल. रोग कोणता आहे ते कळले आहे, त्यावर औषध कोणते आहे तेही कळले आहे. आता अंतर्यामी पूर्ण विश्वास असू द्या. मदतीसाठी तथाकथित श्रीमंत आणि मोठ्या लोकांच्या तोंडाकडे पाहू नका. हृदयशून्य बुद्धिवादी लेखकांची आणि वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या सहानुभूतिशून्य लेखनाची पर्वा करु नका. विश्वास, सहानुभूती - जळजळीत विश्वास, जळजळीत सहानुभूती! जीवन-मरण, तहान-भूक, थंडी-वारा, कशाचीही तमा बाळगू नका. प्रभूचा जयघोष करा! जय प्रभू! जय प्रभू! चला, पुढे पुढे चला, प्रभूच आपला सेनापती आहे. मागे वळून बघू नका; कोण पडला ते पाहू नका. पुढे व्हा, समोर चला, बंधूंनो, ह्याप्रमाणे आपण सारखे पुढे पुढे जात राहू. एकजण जर पडेल तर त्याची जागा तात्काळ दुसरा कुणीतरी घेईल.

अमेरिकेत ज्याचा जन्म झाला आहे त्याला "मी माणूस आहे" हे ज्ञान असते. त्याच्या उलट भारतात जो जन्मला आहे तो "मी समाजाचा केवळ गुलाम आहे," असेच समजून असतो. स्वाधीनता हीच उन्नतीची एकमात्र गुरुकिल्ली असून ती काढून घेतल्यास वैयक्तिक आणि सामाजिक अवनती होतेच होते. आधुनिक युगातील चढाओढ आणि संघर्ष यांच्यामुळे जातिभेद कसा झपाट्याने नष्ट होत आहे हे पाहा! उत्तर हिन्दुस्थानात दुकानदारी करणारे ब्राह्मण, जोडे विकणारे ब्राह्मण, दारु गाळणारे ब्राह्मण सर्वत्र आढळतात. का? स्पर्धा आणि जीवनसंघर्ष हेच याचे कारण होय. आपल्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही व्यक्ती वाटेल त्या व्यवसायाचा अवलंब करु शकते. याचा परिणाम हाच झाला की चोहोकडे तीव्र चढाओढ सुरु झाली. समाजात असे हजारो लोक आहेत की ज्यांच्या ठिकाणी निरनिराळ्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त करुन घेण्याची योग्यता असते आणि म्हणूनच हे लोक तळाशी स्वस्थ पडून न राहता सर्वोच्च स्थानासाठी सारखे धडपड करताना व ते मिळविताना आढळतात.

भगवान सतत माझ्या पाठीशी आहेत याचा मला दिवसेंदिवस अनुभव येत आहे आणि मी त्यांच्या आदेशानुसार वागण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांचीच इच्छा पूर्ण होवो..... आपण जगासाठी मोठमोठी कार्ये करु, नाम - यशाच्या मोहाने नव्हे, तर पूर्ण नि:स्वार्थ भावनेने.

**Ours not to reason why, ours but to do and die.** का? असा प्रश्न करण्याचा आपल्याला अधिकार नाही - कार्य करता करता मृत्युमुखी पडणे हेच आपले कर्तव्य होय. साहस बाळगा. भगवंताने आपल्याला थोर कर्मे करण्यासाठी निवडले आहे असा विश्वास असू द्या आणि ती आपण करुच करु. तयार व्हा - पवित्र आणि शुद्ध बना, आणि प्रेमासाठीच प्रेम करा. कोणताही स्वार्थ राहू देऊ नका. गरीब, दु:खी व दलित यांच्यावर प्रेम करा आणि प्रभू तुमच्यावर अवश्य कृपा करील.

आपल्या मित्रांना वरचेवर भेटत जा आणि भारताच्या सर्वसाधारण जनतेविषयी सहानुभूती बाळगण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करा. त्यांना सांगा की गरिबांच्या उन्नतीच्या मार्गात ते कसा अडथळा निर्माण करीत आहेत आणि जर ते त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणार नाहीत तर मनुष्य म्हणवून घ्यावयाच्या योग्यतेचे देखील ते राहणार नाहीत. निर्भय व्हा, प्रत्यक्ष ईश्वर तुमच्या पाठीशी आहे. तो भारतातील लाखो करोडो भुकेल्या आणि अज्ञानी लोकांचा उद्धार करील हे निश्चित समजा.

सुशिक्षित युवकांमध्ये कार्य करुन त्यांना एकत्र आणा, त्यांना संघटित करा. महान त्यागानेच महान कार्ये होऊ शकतात. कुठलाही स्वार्थ राहू देऊ नका. तुमच्या, माझ्या किंवा आपल्या गुरुदेवांच्या देखील नावाची वा कीर्तीची आकांक्षा ठेऊ नका! जेणेकरून आपले संकल्प व आपल्या योजना कृतीत उतरतील यांसाठी जीव तोडून प्रयत्न करा, प्राणपणाने प्रयत्न करा. वत्सांनो, हे वीरांनो, थोर हृदयाच्या तरुणांनो, उठा आणि कामाला लागा. नावलौकिकासाठी अथवा अन्य एखाद्या क्षुद्र वस्तूसाठी मागे वळून बघू नका. स्वार्थाचे संपूर्णपणे निर्मूलन करुन कार्याला लागा.

**'तृणैर्गुणत्वमापनैः बध्यन्ते मत्तदन्तिनः'** - गवत एकत्र करुन जेव्हा त्याचा दोर वळण्यात येतो तेव्हा त्याने मत्त हत्तीला देखील बांधता येते हे लक्षात असू द्या.

तुम्हा सर्वांवर भगवंताच्या कृपेचा वर्षाव होवो! त्याची शक्ती तुम्हा सर्वांमध्ये येवो - नव्हे, ती तुमच्यामध्ये आधीचीच विद्यमान आहे. असा माझा दृढ विश्वास आहे. वेद म्हणतात, **उत्तिष्ठतः जाग्रतः प्राप्य वरान्निबोधतः** उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका. उठा, उठा, लांबच लांब रात्र संपून अरुणोदयाचा समय जवळ आला आहे. आता एक विशाल लाट उठली आहे. तिचा वेग कुणीही रोधू शकणार नाही. वत्सांनो, उत्साह असू द्या. प्रेम असू द्या. दृढ श्रद्धा असू द्या. हृदयातून भीती अगदी काढून टाका - भीतीच सर्वापेक्षा मोठे पाप होय.

सर्वांना माझा आशीर्वाद सांगा. आपल्या कार्याला ज्यांनी हातभार लावला त्या साऱ्या थोर हृदयाच्या व्यक्तींना माझी अनंत कृतज्ञता कळवा. परंतु त्यांनी आपल्या कार्यात शिथिल होऊ नये एवढीच माझी त्यांना विनंती आहे. आपल्या विचारांचा चोहोकडे प्रचार करा. अहंकारी बनू नका, आपल्या मताविषयी दुराग्रह बाळगू नका, कुणाच्याही विरुद्ध जाऊ नका. भिन्न भिन्न रासायनिक द्रव्ये एकत्र मिश्रित करुन ठेवणे हेच आपले कार्य होय. त्यांचे कसे व केव्हा स्फटिक बनतील हे फक्त ईश्वरालाच ठाऊक. तुमच्या वा माझ्या सफलतेचा गर्व करु नका, हीच मुख्य गोष्ट लक्षात असू द्या. मोठमोठी कामे अद्याप व्हावयाची आहेत. भविष्यकाळी जे काही होणार आहे त्याच्या तुलनेने आपले हे अल्प यश अगदीच क्षुद्र आहे. विश्वास ठेवा, प्रभूचे फर्मान निघाले आहे की भारताची उन्नती होईलच होईल. सर्वसामान्य जनता व गरीब लोक सुखी होतीलच होतील. हा प्रभूचाच आदेश आहे. आणि ह्या साऱ्यासाठी प्रभूंनी तुम्हाला साधन म्हणून निवडले आहे याबद्दल आनंद माना. मला दिसत आहे की, आध्यात्मिकतेचा पूर उसळला आहे, साऱ्या पृथ्वीला तो व्यापून टाकीत आहे, त्याला मर्यादा नाही, त्याला आता कुणीही अडवू शकत नाही. सारेजण आता पुढे व्हा, सारेजण आपल्या शुभेच्छा त्यात मिसळा, सारेजण त्याचा मार्ग

मोकळा करा, प्रभूचा जयजयकार असो!

मला कोणत्याही प्रकारच्या मदतीची आवश्यकता नाही. तुम्ही पैसे गोळा करुन एखादा निधी उभारा. या निधीतून मग काही मॅजिक लॅन्टर्न्स, नकाशे, ग्लोब, रासायनिक द्रव्ये इत्यादी वस्तू विकत घ्या. दररोज संध्याकाळी गरीब व दलित लोकांना, एवढेच नव्हे तर अस्पृश्यांनादेखील एका ठिकाणी जमवा आणि प्रथम त्यांना सदाचाराचे उपदेश द्या आणि मग मॅजिक लॅन्टर्नच्या व इतर वस्तूंच्या साहाय्याने त्या लोकांच्याच भाषेत त्यांना खगोलशास्त्र, भूगोल इत्यादी विषय शिकवा. तेजस्वी व उच्च ध्येयवादी नवयुवकांचा एक गट स्थापन करा आणि त्यांना चांगल्या रीतीने तयार करा. तुमच्यामध्ये असलेला उत्साहाग्नी त्यांच्या ठिकाणी देखील प्रज्वलित करा आणि हे कार्य हळूहळू वाढू द्या व त्याचे क्षेत्रदेखील अधिकाधिक व्यापक होऊ द्या. तुम्हाला जेवढे अधिक काम करता येईल तेवढे करा. सारे पाणी वाहून गेल्यानंतर आम्ही नदीच्या पार जाऊ असा विचार करुन वाट बघत स्वस्थ बसू नका. मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी चालू करणे ठीक आहे यात शंका नाही, पण अगदी थोडे जरी असले तरी प्रत्यक्ष कार्य हे सदैव होणाऱ्या वटवटीपेक्षा वा कलमबाजीपेक्षा केव्हाही अधिक चांगले होय.

कार्याचा आरंभ लहान स्वरुपाचा आहे म्हणून भिऊ नका. अशा लहान कार्यातूनच पुढे मोठी कार्ये उत्पन्न होत असतात. धैर्य असू द्या. धीर सोडू नका. आपल्या बांधवांचा नेता बनण्याची धडपड करु नका, त्यांचे सेवक बना. नेतेगिरीच्या पाशवी प्रवृत्तीने जीवनरुपी महासागरात अनेक मोठमोठी जहाजे बुडवून टाकली आहेत. म्हणून ह्याबाबतीत अत्यंत सावध रहा. मृत्यूला देखील तुच्छ लेखून शेवटपर्यंत संपूर्ण नि:स्वार्थपणे कार्य करा. हे वीर युवकांनो, प्रभूच तुम्हाला सर्वकाही समजावून देतील. लागा! लागा! कार्याला लागा! प्रभूचा जयजयकार असो!...

वत्सांनो, कार्य सुरु करा - तुमच्यामधे अग्नी प्रज्वलित होईल. संघटित होऊन कार्य करण्याची क्षमता आपल्या अंगी मुळीच नाही. ती आता

आपण अंगी आणली पाहिजे आणि याचे रहस्य जर कशात असेल तर ते मत्सराच्या अभावात आहे. आपल्या बंधूंशी, आपल्या सहकाऱ्यांशी सर्वदा सहमत होण्यासाठी तयार राहिले पाहिजे आणि त्यांच्याशी नेहमी जुळते घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संघटित होऊन कार्य करण्याचे हेच रहस्य होय. शूरपणाने परिस्थितीला तोंड द्या. जीवन क्षणभंगुर आहे - ते एखाद्या महान कार्यासाठी वेचा!

• • •

*मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## ३. शील घडविणारे शिक्षण

एखाद्या माणसाचे शील म्हणजे त्याच्या प्रवृत्तींचा समुच्चय किंवा त्याच्या मानसिक कलांची गोळाबेरीज होय. सुखदु:खाचे अनुभव घेत असता त्यांचे संस्कार मनावर उमटतात आणि अशा संस्कारांच्या परिणामालाच मनुष्याचे शील असे म्हणतात. आपले विचार आपल्याला घडवीत असतात. आपल्या शरीररुपी लोखंडावर प्रत्येक विचाररुपी हातोडीचा घाव आपल्याला हवा असल्याप्रमाणे आकार त्याला देत असतो. शब्द गौण असतात, विचार नित्य असून ते फार दूरवर पसरतात. म्हणूनच तुम्ही आपल्या विचारांची कसोशीने काळजी घ्यावयास हवी.

शील घडविण्याच्या बाबतीत चांगल्याचा आणि वाईटाचा सारखाच वाटा असतो आणि काही बाबतींत तर सुखापेक्षा दु:खच अधिक श्रेष्ठ गुरु ठरते. जगाने आजवर निर्माण केलेल्या थोर विभूतींच्या चारित्र्याचे अनुशीलन करुन मी असे छातीठोकपणे सांगू शकतो की, त्यांच्यापैकी बहुतेकांना सुखापेक्षा दु:खानेच अधिक शहाणपण शिकविले, संपत्तीपेक्षा दारिद्र्यानेच अधिक धडा दिला आणि स्तुतीपेक्षा आघातांनीच त्यांच्यातील अंत:स्थ तेज अधिक खुलून उठले आहे. भोगविलासाच्या प्राचुर्यात वाढून, फुलांच्या शय्येवर लोळून, कधी एकदेखील अश्रू गाळण्याची पाळी न येता कोण बरे थोर होऊ शकला आहे? हृदय ज्या वेळी दारूण यातनांनी अगदी व्याकुळ होते, दु:खाचे वादळ ज्यावेळी चोहीकडे घोंघावू लागते, आशा सुटून जाऊन धैर्य अजीबात खचून गेल्यामुळे या साऱ्यातून सुटण्याची अंधुकशी शक्यताही ज्या वेळी मनाला जाणवत नाही, अशाच वेळी, हृदयात हे असे प्रचंड तुफान माजले असतानाच

अंत:स्थ शक्ती प्रकट होते, अंत:स्थ ज्योती प्रकाशू लागते.

मनाला सरोवराची उपमा दिल्यास असे म्हणता येईल की त्यात उठणारा कोणताही तरंग, कोणतीही लाट शांत होताना पूर्णपणे कधीच लोप पावत नसते, तर आपल्यामागे एक चिन्ह (संस्कार) व ते चिन्ह पुन्हा जागृत होण्याची शक्यता ठेवून जात असते. आपण केलेले प्रत्येक कार्य, आपल्या शरीराची प्रत्येक हालचाल, आपला प्रत्येक विचार आपल्या चित्तावर असाच संस्कार उमटवून जात असतो. हे असले संस्कार जाणिवेच्या पृष्ठभागावर दृश्य नसतात त्या वेळीदेखील ते जाणिवेखाली कार्य करण्यास पूर्ण समर्थ असतात. चित्तावरील ह्या संस्कारांची समष्टीच आपल्याला प्रतिमुहूर्ती नियंत्रित, नियमित करीत असते. प्रत्येक मनुष्याचे चारित्र्य ह्या संस्कारांच्या समष्टीनेच नियमित होत असते. चांगल्या संस्कारांची सरशी झाल्यास शील चांगले व वाईटांचा वरचष्मा झाल्यास ते वाईट बनते. एखादा मनुष्य सतत अपशब्द ऐकेल, अमंगल चिंतन करील, दुष्कृत्ये आचरील तर त्याच्या मनावर त्यांचेच वाईट संस्कार होत राहतील आणि अगदी त्याच्या न कळत – त्याच्या लक्षात सुद्धा न येता – ते त्याच्या आचारविचारांवर प्रभाव पाडतील. वास्तविक पाहता ते कुसंस्कार नेहमीच क्रियाशील असतात. ह्याच संस्कारांची समष्टी त्याच्यात दुष्कृत्य करण्याची प्रबळ प्रेरणा निर्माण करील. तो या संस्कारांच्या हातांतील एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणे होऊन जाईल.

याचप्रमाणे जो मनुष्य सद्विचारी असून नेहमीच सत्कृत्ये करतो त्याच्या बाबतीतही वरीलप्रमाणेच संस्कारांची समष्टी त्याला अगदी त्याच्या इच्छेविरुद्ध सत्कृत्ये करावयास भाग पाडील. जो मनुष्य अशी पुष्कळशी सत्कृत्ये व सद्विचार करतो त्याच्या ठिकाणी सद्वर्तन करण्याची एक अदम्य प्रवृत्ती निर्माण होते. वाईट करावयाचे त्याने मनात आणले तरीही त्याच्या मनातील या सत्प्रवृत्तींचा प्रवाह त्याला तसे करु देणार नाही. या सत्प्रवृत्तींचा पूर्ण प्रभाव त्याच्यावर असतो. अशी परिस्थिती निर्माण झाल्यावरच मनुष्याचे शील बनले असे आपण म्हणतो. एखाद्या माणसाचे शील अजमावताना त्याने केलेल्या मोठमोठ्या गोष्टी विचारात घेऊ नका. तो अगदी सामान्य गोष्टी करीत

असतानाच त्याच्यावर नजर ठेवा. थोर मनुष्याचे खरे चारित्र्य ह्या क्षुल्लक गोष्टींतूनच प्रत्ययास येत असते. मोठमोठ्या प्रसंगी एखाद्या अगदी निकृष्ट माणसालाही काहीतरी महत्कृत्य करुन टाकण्याचा चेव येत असतो, परंतु खराखरा थोर पुरुष तोच की ज्याचे चारित्र्य सर्वदा आणि सर्वत्र श्रेष्ठ प्रतीचे असते.

असे पुष्कळसे संस्कार मनावर घडल्यानंतरच एकवटून ते सवयीत परिणत होतात. 'सवय ही जणू स्वभावच होय,' अशी म्हण आहे. पण वस्तुत: 'जणू' नसून तीच माणसाचा खराखुरा आणि अवघा स्वभाव होय. आपण आज जे काय आहोत ते सवयीचेच फल होय आणि हीच समाधानाची गोष्ट आहे, कारण सवय लावून घेणे किंवा सोडणे आपल्याच हाती असते. वाईट सवयींच्या विरुद्ध तद्विपरीत सवयी जडवून घेणे हाच वाईट सवयींवर एकमात्र उपाय आहे. साऱ्या वाईट सवयी ह्या चांगल्या सवयींनी कह्यात आणता येतात. सतत सत्कृत्ये व अखंड पवित्र विचार करीत राहा. हीन संस्कारांना लगाम घालण्याचा तोच एकमात्र मार्ग आहे. एखादा मनुष्य अगदी वाया गेला आहे असे म्हणून त्याला सोडून देऊ नका. कारण नवीन उच्च संस्कारांनी सुधारता येण्याजोगा कुशीलाचा आणि कुसंस्कारांचा एक प्रतिनिधीच त्याच्या रुपाने आपल्यासमोर उभा असतो. शील हे सवयींच्या सतत अभ्यासाचा परिणाम असल्यामुळेच सवयींच्या सतत अभ्यासाने ते सुधारता येणे शक्य आहे.

साऱ्या दृश्य वाईटाचे कारण आपल्यातच विद्यमान आहे. त्यासाठी दुसऱ्या कोणत्याही दैवी शक्तीला बोल लावू नका. निराश होऊ नका, उद्विग्न होऊ नका किंवा अशीही कल्पना करुन घेऊ नका की दुसऱ्या कोणी हात दिल्याखेरीज आपली सुटका होणे शक्य नाही अशा जागी आपण पडून आहोत. आपण रेशमाच्या किड्याप्रमाणे आहोत. आपण आपल्यातूनच तंतू काढून आपले कोसले विणतो आणि कालान्तराने त्यात गुरफटून जातो. कर्माचे हे जाळे आपणच आपल्याभोवती विणतो आणि अज्ञानाने आपणाला आपण बद्ध आहोत असे वाटून आपण मदतीसाठी रडून आकांत मांडीत असतो. परंतु ही मदत कोठून बाहेरून येत नसते. ती येत असते आपल्या आत्म्यातूनच.

विश्वाच्या साऱ्या देवतांपुढे आपले गाऱ्हाणे मांडून पाहा; मी असे केले आणि अखेरीस मला साहाय्य मिळालेही, - पण ते आले होते आतूनच. मी केलेल्या चुका मलाच सुधाराव्या लागल्या; स्वत:भोवती मी विणलेले जाळे मला स्वत:लाच कापावे लागले. आयुष्यात मी अनेक चुका केल्या, पण त्याचबरोबर हेही ध्यानात ठेवा की त्या चुकांखेरीज आज मी जो आहे तो कधीच होऊ शकलो नसतो. माझ्या म्हणण्याचा गैरसमज करुन घेऊ नका. मला असे म्हणावयाचे नाही की तुम्ही घरी जाऊन जाणूनबुजून चुका करावयास आरंभ करा. मला सांगावयाचे आहे एवढेच की, झालेल्या चुकांचे रडगाणेच वृथा गात बसू नका.

आपण चुका करतो कारण आपण दुर्बल आहोत आणि आपण दुर्बल आहोत कारण आपण अज्ञानी आहोत. आपल्याला अज्ञानी कोण करते? आपणच. आपल्याच हातांनी आपले डोळे झाकून घेऊन आपण आक्रंदू लागतो की चहूबाजूला अंधार पसरलेला आहे. हात बाजूला सारुन पाहा की सर्वत्र उजेडच पसरलेला दिसेल. प्रकाश हा तर नेहमीचाच आहे, कारण मानवी आत्मा स्वभावत:च स्वयंप्रकाश आहे. आजचे विज्ञानवेत्ते काय म्हणतात हे तुम्हाला ठाऊक नाही का? क्रमविकासाचे कारण काय? इच्छा. प्राण्यांना एखादी गोष्ट साधावयाची असते, पण भोवतालची परिस्थिती त्यांना अनुकूल नसते आणि म्हणून ते दुसरा अधिक विकसित देह धारण करतात. हा विकास कोण घडवून आणतो? स्वत: तो प्राणीच - त्याची इच्छाशक्ती. आपल्या इच्छाशक्तीचा सारखा उपयोग करीत रहा म्हणजे तीच तुम्हाला उन्नतिपथावर अग्रेसर करील. इच्छाशक्ती सर्वशक्तिमान आहे. तुम्ही विचाराल, ती सर्वशक्तिमान जर आहे तर मी सर्वकाही का करु शकत नाही? पण तुम्ही आपल्या आताच्या क्षुद्र 'मी' चाच विचार करीत आहात. एकपेशी अवस्थेपासून माणसापर्यंतच्या आपल्या साऱ्या क्रमविकसित अवस्थांकडे नजर फेका; हे सारे कोणी घडवून आणले? जिने तुमची एवढी मजल गाठून दिली ती तुम्हाला खचित अधिक उन्नत करील. आवश्यकता आहे तिला सामर्थ्यशाली बनविण्याची, शीलाची.

महत्कार्य करण्यासाठी मोठे व चिकाटीचे प्रयत्न बराच काळपर्यंत

करावे लागतात. काही व्यक्तींना या कार्यात अपयश आले तरी त्याची तमा बाळगण्याचे कारण नाही. अध्यात्माच्या धगधगीत अग्नीच्या साहाय्याने मनुष्याच्या हृदयातील स्वार्थ व इतर असत्प्रवृत्ती नष्ट करण्याच्या या प्रयत्नात त्या असत्प्रवृत्तींनी व त्या स्वार्थीपणाने जोरदार बंड उभारावे, थैमान घालावे हे जसे स्वाभाविक आहे, तसेच असा प्रयत्न करणाऱ्यांच्या मार्गात अडचणी येणे, दुर्लंघ्य विपत्तींना तोंड द्यावे लागणे व काहींचा त्यापुढे निरुपाय होऊन त्यांना अपयश येणे हेही स्वाभाविक आहे. मांगल्याकडे जाणारा या जगातील मार्ग अत्यंत बिकट, त्रासदायक, किंबहुना निसरड्या कड्यासारखाच असतो. तेव्हा या कड्यावरून जाताना कित्येकांनी कोसळावे यात नवल मुळीच नाही; अनेकांना या मार्गावरून जाण्यात यश येते हीच खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. या मार्गात हजारो प्रमाद होतील, अनेकदा ठेच लागेल; परंतु यातूनच चारित्र्य तावूनसुलाखून निघते.

स्वत:ला शुद्ध करा म्हणजे जग आपोआप शुद्ध होईलच. ही एकच गोष्ट शिकविण्याची आज पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे. आपण शेजाऱ्यांच्या वागणुकीकडे अधिकाधिक लक्ष देऊ लागलो आहोत, आणि स्वतःच्या वागणुकीकडे मात्र आपण कमी कमी लक्ष देत आहोत. आपण बदललो की जग बदलेलच; आपण शुद्ध झालो की जगही शुद्ध होईलच. प्रश्न असा आहे की इतरांमधील दोष मला का दिसावेत? याचे उत्तर हेच की मी जर सदोष नसेन तर मला इतरांमध्ये दोष दिसू शकणार नाही. मी स्वत: दुर्बल नसलो तर मी दु:खी होणार नाही.

आत्मसंयम साधला आहे अशा माणसावर कोणतीच बाह्य वस्तू परिणाम करू शकणार नाही. त्याला मग आणखी कुणाच्या वा कशाच्या गुलामगिरीत खितपत पडावे लागणार नाही. त्याचे मन मुक्त होऊन गेलेले असते. केवळ अशीच व्यक्ती या संसारात वास करण्यास सर्वथा पात्र होय. या जगाविषयी साधारणपणे लोकांची दोन मते असल्याचे आपल्याला आढळून येईल. काही लोक निराशावादी असतात. ते म्हणत असतात, "किती भयंकर, किती दुष्ट आणि किती वाईट जग हे!" तर दुसरे काही लोक आशावादी

असतात, ते म्हणतात, "हे जग किती सुंदर, किती अद्भुत आहे!" ज्यांनी आपल्या मनावर जय मिळविलेला नाही, त्यांच्या दृष्टीने जग हे दुःखाने पूर्ण, अथवा फारच झाले तर सुखदुःखमिश्रित असेच ठरत असते. आपण ज्या वेळी स्वतःच्या मनावर प्रभुत्व मिळवू शकू त्या वेळी हेच आपले जग आपल्याला सुखमय वाटू लागेल. त्या वेळी मग काहीही आपल्यावर चांगला अथवा वाईट परिणाम करू शकणार नाही. आपल्या दृष्टीला सर्वत्र, व्यवस्थितपणा, सुसंबद्धता व एकसूत्रता आढळेल.

प्रेम, धर्म आणि पवित्रता ही आपल्या स्वतःच्या हृदयात जितकी जितकी वृद्धिंगत होतात, तितके तितके आपल्याला बाहेर जास्त जास्त प्रेम, धर्म आणि पवित्रता दिसू लागते. आपण दुसऱ्यांची, जी सारी निंदा करतो, तिने वस्तुतः आपण स्वतःच निंदिले जात असतो.

जगात जी काय खरीखरी प्रगती झाली आहे ती सारी प्रेमाच्या शक्तीनेच झाली आहे. दोष दाखवीत बसल्याने कधी कोणतेही चांगले काम केले गेलेले नाही. निंदेने, तिरस्काराने कधीच काही चांगले होत नाही.

हातून काही चुका घडल्या म्हणून घरी जाऊन अंगाला राख फासून, गोणपाट गुंडाळून घेऊन रडत बसाल तर त्यापासून काहीच लाभ नाही. त्यामुळे तुम्ही आणखी दुर्बल मात्र व्हाल. ही खोली हजारो वर्षांपासून अंधाराने व्यापली आहे असे म्हणून येथे येऊन जर तुम्ही रडून आकांत मांडाल तर हा अंधार नाहीसा होईल काय? आगपेटीची एक काडी ओढा, एका क्षणात ती सारी खोली उजळून जाईल. अरेरे, मी दुष्कृत्य केले. किती तरी चुका केल्या, असा विलाप सारा जन्मभर करीत बसण्यात काय लाभ? हे सारे तर आहेच आहे, ते सांगावयास कुणाचीही गरज नाही. गरज आहे ज्ञानाच्या प्रकाशाची. तो येऊ द्या की एका क्षणात सारे अमंगल दूर पळून जाईल. आपले चारित्र्य बनवा, आपले ज्योतिर्मय, स्वयंप्रकाश, नित्यशुद्ध, वास्तविक स्वरुप प्रकट होऊ द्या आणि इतरही प्रत्येकात त्याचेच आवाहन करा!

• • •